जिल्ह्यातील धरणात १५२.७८ दलघमी पाणीसाठा >>पान 2

तृतीयपंथीयांच्या हक्कांचेही होणार संरक्षण - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे >>पान 3

वर्षभरात कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून येईल - आमदार सिद्धार्थ खरात >>पान 4

सुविचार

विचार सकारात्मक ठेवा, जीवन सुंदर होईल.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 229 ■ बुधवार, दि. 02 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



घटस्फोट मिळवण्यासाठी अभिनेत्रीने नवऱ्याला दिली तब्बल 'इतकी' पोटगी!

आतील पान

# राज्यात ई-बाइक टॅक्सीला परवानगी



## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय; सरकारच्या वतीने दहा हजार रुपये अनुदान देखील देण्यात येणार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई : महाराष्ट्रातील रोजगारासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महत्वाची घोषणा केली आहे. तसेच रिक्षा टॅक्सीचालकांनादेखील त्यांनी आनंदाची बातमी दिलीय. ई बाईक धोरण, बाईक टॅक्ससंदर्भातही त्यांनी महत्वाची अपडेट दिलीय. ई बाईक धोरण महाराष्ट्रात स्वीकारले जाईल. बाईक टॅक्सी महाराष्ट्रात सुरू होईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलीय. महिला सुरक्षेच्यादृष्टीने काही नियमावली बनवण्यात आली आहे. पावसात भिजू नयेत म्हणून ई बाईक आणल्या जातील, असेही ते पुढे म्हणाले. महिला सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.**

इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी ई बाईक पर्याय आणला जात आहे. असे असले तरी त्यांचे दर काय असतील याबाबत अद्याप ठोस निर्णय झाला नसल्याचे ते म्हणाले. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना आनंदाची बातमी दिलीय. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना दहा हजार अनुदान द्यायचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्रात २० हजार रोजगार तयार होतील. १० हजारांहून अधिक रोजगार निर्मिती मुंबईतच निर्मिती होणार असल्याचे प्रताप सरनाईक म्हणाले.

एसटी बस चालवताना मोबाईलवर क्रिकेट मॅच बघणाऱ्या चालकाला एसटी महामंडळानं बडतर्फ केलं आहे. शनिवारी सायंकाळी ७ वाजता दादरहून स्वारगेटला खासगी ई-शिवनेरी बस निघाली. या बसचा चालक रात्री लोणावळ्याजवळ बस चालवत असतानाच चक्क क्रिकेट मॅच पाहत होता. त्याचा व्हिडिओ बसमधील एका प्रवाशानं रेकॉर्ड करुन, तो परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठवला. त्यावर सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना तातडीनं कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी प्रवाशांचा जीव धोक्यात घालणे, आणि बेशिस्तपणे वाहन चालवल्याप्रकरणी चालकाला बडतर्फ करण्यात आलेय. तर संबंधित खासगी संस्थेला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेची गंभीर दखल घेत कारवाई केली जात असल्याचे ट्विट केले होते. परिवहन खात्याचा कारभार हातात घेतल्यापासून प्रताप सरनाईक अनेक महत्वाचे निर्णय घेत आहेत.

## उद्योग विभागाची १०० टक्के उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल - उद्योगमंत्री

■ १०० दिवसांच्या कामकाज आराखडासंदर्भात बैठक

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आखून दिलेल्या १०० दिवस आराखड्यात निश्र्चित केलेल्या उद्दिष्टांची १०० टक्के पूर्तता होण्याकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यकतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या बैठकीस उद्योग सचिव डॉ. पी अनबलगन, एम.आय.डी.डी.चे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु, विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह, सह मुख्य कार्यकारी अधिकारी विजय राठोड तसेच उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दावोस येथे झालेल्या करारामध्ये उद्योग विभागाने २३५ टक्के उद्दिष्टपूर्ती केली असल्याचे सांगून उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, परकीय थेट गुंतवणुकीत महाराष्ट्रात देशाच्या तुलनेत ४०.८९ टक्के गुंतवणूक झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग संचालनालय, मैत्री, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, शासकीय मुद्रणालय आणि क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या उद्दिष्टांची ९० ते ९५ टक्के पूर्तता झाली असून संपूर्ण उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उद्योग मंत्री सामंत यांनी सर्व कार्यालयात स्वच्छता आणि नूतनीकरण करण्याच्या सूचना दिल्या. उद्योग विभाग हा शासन यांनी उद्योजक यांच्यातील महत्वाचा दुवा असल्याने शासन करीत असलेली कामे सामान्यांपर्यंत पोहोचावी, उद्योजकांचे प्रश्र्न मार्गी लागावेत, यासाठी उद्योग सचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी, विकास आयुक्त, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्येक जिल्ह्यात जाऊन जनता दरबार घेण्याच्या सूचना ही त्यांनी केल्या.

## बीडमध्ये हालचालींना वेग, वाल्मिक कराडच्या तुरुंगातून आणखी ३ कैद्यांना हलवलं

**बीड/प्रतिनिधी :** वाल्मिक कराडला मारहाण केल्याचा ठपका ठेवत महादेव गित्ते आणि त्याच्या चार साथिदारांना बीड कारागृहातून हर्सूल कारागृहात हलवण्यात आलं होतं. या मारहाणीच्या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर बीडमध्ये हालचालींना वेग आला असून पोलीस विशेष खबरदारी घेताना दिसत आहे. अशातच बीड जिल्हा कारागृहातील मारहाणीच्या घटनेनंतर बीड पोलिसांनी अक्षय आठवले, मनीष क्षीरसागर आणि सवाई यांना नाशिकच्या कारागृहात हलवण्यात आले आहे.

बीड जिल्हा कारागृहात सोमवारी सकाळी कराड गँग आणि महादेव गित्ते यांच्यामध्ये हाणामारी झाल्याचे समोर आलं होतं. महादवे गित्तेने वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर महादेव गित्तेसह इतर चार आरोपींना हर्सूल कारागृहात हलवल्याची आलं. महादेव गित्तेला पोलिस व्हॅनमधून नेत असताना त्याने ही माहिती दिली. मारहाणीच्या घटनेनंतर महादेव गीते यासह इतर चौघांना संभाजीनगर येथील हरसुल कारागृहात हलवण्यात आले होते. दरम्यान, आज अक्षय आठवले यांच्यासह इतर दोघांना नाशिक कारागृहात पाठवण्यात आले.



मस्साजोग येथे काल (३१ मार्च) मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली नाही. यावर्षी ईद मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचा स्वर्गीय संतोष देशमुख यांचा मानस होता. परिणामी, काल मुस्लिम बांधवांना अश्रू अनावर झाले. मुस्लिम बांधवांचा मुख्य सण असून देखील त्यांच्यामध्ये सणाबद्दल उत्साह नव्हता. त्यांनी माझ्यासोबत दिवसभर वेळ घालवला. केज पोलिसांच्या हातात तपास असताना त्यांनी तो चोखपणे करण्याचा प्रयत्न केला नाही. केज पोलिसांनी कळंबच्या महिलेची चौकशी देखील केली नाही. त्या महिलेने अनेक लोकांना अडकवलं आहे.

## कळंबमध्ये महिलेच्या मृतदेहासोबत दोन दिवस झोपला, तिसऱ्या दिवशी वास येऊ लागल्याने बाहेर पडला, आरोपीची थरारक कबुली

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्याप्रकरणाशी संबंध असलेल्या कळंबमधील महिलेचा मृतदेह चार दिवसांपूर्वी सडलेल्या अवस्थेत सापडला होता. याप्रकरणी आता बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन मारेकऱ्यांना ताब्यात घेतले आहे. रामेश्वर उर्फ राण्या माधव भोसले आणि उस्मान गुलाब सय्यद अशी या दोन आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीने हत्येची कबुली दिली आहे. तसेच आरोपीने पोलिसांना दिलेल्या जबाबात भयावह माहिती देखील समोर आली आहे.

### कळंब येथील द्वारका नगरी वसाहतीत मृत महिलेची माहिती

- मनीषा कारभारी बिडवे असं या मृत महिलेचे नाव
- बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील पठाण मांडवा हे महिलेचे जन्मगाव
- तर बीड जिल्ह्यातील आडस हे महिलेचे माहेर
- कळंब शहरातील द्वारकानगरी वसाहतीत ती एकटी राहत होती
- मृत महिला खासगी सावकारी देखील करत असल्याची माहिती
- अनैतिक संबंधातून महिलेची हत्या झाल्याचा संशय
- महिलेच्या डोक्याला मार लागल्याने मृत्यू झाल्याचा पोस्टमार्टम रिपोर्ट, घरात मृतदेह आणि बाहेरून कुलूप लावलेलं

महिलेची हत्या केल्यानंतर आरोपी मृतदेहा सोबतच त्याच खोलीत दोन दिवस झोपला, अशी थरारक माहिती पोलीस सूत्रांनी दिली. मृतदेहा शेजारी बसूनच त्यांन जेवणही केलं. मात्र तीन दिवसानंतर मृतदेहाचा वास येऊ लागल्यावर तो महिलेची बॉडी घेऊन बाहेर पडला. त्यानंतर आरोपी रामेश्वर भोसलेने आपल्या केज येथील मित्राला घेऊन येत मृतदेहही दाखवला. रामेश्वर भोसले हा मृत महिला मनीषा बिडवे यांच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करायचा. काही आक्षेप असलेले व्हिडिओ आणि फोटो दाखवत मयत महिला आरोपीला टॉर्चर करत असल्याची माहिती त्याने पोलिसांना दिल्याचं कळत आहे. २२ मार्च रोजी हत्या घडली त्या दिवशी महिलेने आरोपीला उठाबशाही काढायला लावल्याचं सूत्रांनी सांगितलं.

सुप्रिया सुळे यांनी काही दिवसांपूर्वी मस्साजोगला जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती तेव्हा गावकऱ्यांनी त्यांना बीड पोलिसांनी रचलेल्या कटाबद्दल सांगितले होते. संतोष देशमुख यांच्या मृतदेहाबाबत माहिती मिळाली तेव्हा गावकरी तिकडे गेले. पोलिसांना संतोष देशमुखांना कुठे नेण्यात आले आहे तिथपासून त्यांचा मृतदेह केजमध्ये आणून टाकेपर्यंत सगळे काही माहिती होते. गावकरी संतोष देशमुखांच्या मृतदेहापाशी पोहोचले तोपर्यंत पोलिसांनी तिकडे एक रुग्णवाहिका आली होती. या रुग्णवाहिकेतून संतोष देशमुखांचा मृतदेह केजकडे न नेता कळंबच्या दिशेने नेण्यात आला. तिकडे एका महिलेला तयार ठेवण्यात आले होते. या महिलेशी संतोष देशमुख यांचे अनैतिक संबंध होते, त्यांच्यातील वादातून संतोष देशमुखांची हत्या झाली, असे बीड पोलिसांना दाखवायचे होते. मात्र, मस्साजोग गावातील तरुण रुग्णवाहिकेचा पाठलाग करत असल्याने हा प्लॅन फसला, असे गावकऱ्यांनी सुप्रिया सुळे यांना सांगितले होते.



## प्रशांत कोरटकरचा जामीन फेटाळला, तुरुंगातील मुक्काम वाढला

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** इतिहास अभ्यासक इंग्रजीत सावंत यांना धमकी देणारा तसेच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्य वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकरचा कारागृहातील मुक्काम आणखी वाढलाय .कोल्हापूर जिल्हा कनिष्ठ न्यायालयाने प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला आहे .सरकारी वकील आणि फिर्यादींच्या वकिलांनी महत्त्वाचा युक्तिवाद आजच्या सुनावणीत केला असून प्रशांत कोरटकर आता कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात दाद मागण्याची शक्यता आहे .न्यायालयाने गेल्या (दि. ३०) सुनावणीत १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. कोल्हापूरच्या कळंबा कारागृहामध्ये त्याची सध्या परवानगी करण्यात आली होती. यानंतर प्रशांत कोरटकरच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली असून दोन्ही बाजूनी वकिलांकडून जोरदार युक्तिवाद आल्यानंतर आता जामिन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

छत्रपती शिवाजी महारांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने अडचणीत आलेल्या प्रशांत कोरटकरने जामीन अर्ज केला होता. त्यावर आज कोल्हापूर जिल्हा कनिष्ठ न्यायालयात सुनावणी आज संपली. कोर्टाने कोरटकरच्या जामीन अर्जाला फेटाळलं असून प्रशांत कोरटकर कोल्हापूर सत्र न्यायालयात दाद मागण्याची शक्यता आहे.

दरम्यान , आज न्यायालयात सरकारी वकील आणि फियार्दी वकिलांचा जोरदार युक्तीवाद झाला. प्रशांत कोरटकर हा शिवभक्त होता, त्याच्या हातून गुन्हा घडायच्या आधी शिवजयंतीला त्याने रायगडला जाऊन महाराजांना अभिवादन केल्याचे पुरावे आहेत असा युक्तिवाद कोरटकरचे वकील सौरभ घाग यांनी केला. तर या प्रकरणात तपास करण्यासारखं काहीच नसून प्रशांत कोरटकरला जामीन दिला तर तो पुन्हा पळून जाईल. आरोपीला समाजात तेढ निर्माण करायची आहे असा युक्तीवाद सरकारी वकिलांनी केला.

## नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीचे वारे

नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्ष राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले. जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच ध्वस्त झाली. २००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते. माओवादी आणि लोकशाही वाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट यलगार पुकारला त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के पी ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचारामुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारी मध्ये एक निवेदन जरी केले या निवेदनात त्यांनी म्हटले की राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले. राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनांमुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

## घटस्फोट मिळवण्यासाठी अभिनेत्रीने नवऱ्याला दिली तब्बल 'इतकी' पोटगी!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड आणि टेलिव्हिजन अभिनेत्री श्वेता तिवारी तिच्या अभिनयासोबतच वैयक्तिक आयुष्यातील संघर्षांमुळेही चर्चेत राहिली आहे. तिच्या वैवाहिक आयुष्यातील संघर्ष, घटस्फोटाची प्रक्रिया आणि मुलीच्या कस्टडीसाठी दिलेल्या पोटगीची गोष्ट पुन्हा चर्चेत आली आहे.

श्वेता तिवारी आणि राजा चौधरी यांचा विवाह १९९८ मध्ये झाला होता. काही वर्ष सुरळीत संसार केल्यानंतर त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. श्र्वेताने आरोप केला की राजा तिच्यावर घरगुती हिंसाचार करत होता. त्यामुळे तिने २००७ मध्ये घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आणि मुलगी पलकच्या कस्टडीसाठी लढा दिला.श्वेताने एका मुलाखतीत सांगितले की, राजाने तिला घटस्फोट द्यायच्या अटीवर मोठ्या पोटगीची मागणी केली होती. त्यानुसार तिने मुंबईतील मालाड परिसरात एक १ इक्ष फ्लॅट राजाच्या नावावर केला. त्यानंतरच त्याने घटस्फोटास मंजुरी दिली आणि पलकची कस्टडी श्र्वेताकडे आली.

श्वेताने स्पष्ट केलं की, ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होती, पण ती ही लढाई फक्त पैशांसाठी नव्हती तर मुलीच्या सुखासाठी होती. मुलीला वडिलांशिवाय वाढवणं मी टाळायचं ठरवलं होतं, पण जेव्हा मन:शांती हरवते तेव्हा विभक्त होणं हेच योग्य ठरतं, असंही तिने स्पष्ट केलं.

# जिल्ह्यातील धरणात १५२.७८ दलघमी पाणीसाठा

- पाच तालुक्यात १९ टँकरद्वारे पाणी पुरवठा
- जिल्हा व तालुका प्रशासनाच्या उपाययोजना सुरु
- पाणी जपून वापरण्याचे नागरिकांना आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी : पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये आज रोजी १५२.७८६ दलघमी (३२.६५ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे. उन्हाळ्यातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा व तालुका प्रशासनाने उपाययोजना सुरु केल्या असून त्यानुषंगाने जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १७ गावांमध्ये १९ खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.**

जिल्ह्यातील नळगंगा, खडकपूर्णा आणि पेनटाकळी या तीन मोठ्या प्रकल्पामध्ये ७१.६६२ दलघमी(३२.१८ टक्के) तर ज्ञानगंगा, मस, कोराडी, पलढग, मन, तोरणा व उतावळी या सात मध्यम प्रकल्पामध्ये ५३.६८० दलघमी (३७.८९ टक्के) व ४१ लघु प्रकल्पामध्ये २७.४४४ दलघमी (२६.४९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे.

जलाशय पातळी अहवालानुसार मोठ्या प्रकल्पांतर्गत नळगंगा प्रकल्पामध्ये ३५.३२ दलघमी(५१ टक्के), खडकपूर्णा प्रकल्पामध्ये ८.३२ दलघमी (९ टक्के), पेनटाकळी प्रकल्पामध्ये २८.०२ दलघमी(४७ टक्के) या तीन मोठ्या प्रकल्पामध्ये एकूण ७१.६६२ दलघमी (३२.१८ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे.

तर मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ज्ञानगंगा प्रकल्पामध्ये २२.०५ दलघमी(६५ टक्के), मस प्रकल्पामध्ये ५.२४ दलघमी (३५ टक्के), कोराडी प्रकल्पामध्ये ३.६९ दलघमी (२४.४० टक्के), पलढग प्रकल्पामध्ये १.२४ दलघमी (१७ टक्के), मन प्रकल्पामध्ये १४.३६ दलघमी (३९ टक्के), तोरणा प्रकल्पामध्ये ०.७५ दलघमी (१० टक्के), उतावळी प्रकल्पामध्ये ६.३५ दलघमी (३२ टक्के) असे एकूण सात मध्यम प्रकल्पामध्ये ५३.६८ दलघमी (३७.८९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे. तसेच एकूण ४१ लघु प्रकल्पामध्ये २७.४४४ दलघमी (२६.४९ टक्के) पाणी साठा उपलब्ध आहे.


संग्रहीत छायाचित्र



### शहरी व ग्रामीण भागात पाणी पुरवठ्यासाठी उपाययोजना सुरु - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

उन्हाळ्यातील पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांना पुरेशा पाणी पुरवठ्यासाठी जिल्हा व तालुका प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. तीव्र पाणीटंचाई भागांमध्ये खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली जात आहे. ग्रामीण भागातील १०८ गावात ११८ विहिरी अधिग्रहण करून पाणी पुरवठा देखील केला जात आहे. पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी जपून पाणी वापरावे आणि त्याचा अपव्यय टाळावा. प्रशासन आपल्या स्तरावर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

### पाच तालुक्यात १९ टँकरने पाणी पुरवठा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १७ गावांसाठी १९ टँकर पाणी पुरवठ्याकरिता मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये मेहकर तालुक्यातील ६, बुलढाणा येथे ५, चिखली येथे ३, सिंदखेड राजा येथे १ अशा १५ गावांसाठी प्रत्येकी एक टँकर तर देऊळगावा राजा येथील २ गावांसाठी ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.

टँकरने होणारा पाणीपुरवठा याप्रमाणे: मेहकर तालुक्यातील पारडी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड, बोथा व पाथर्डी या गावांसाठी प्रत्येकी एक टँकर. बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, सैलानी, ढासाळवाडी, पिंपरखेड व चौथा गावांसाठी प्रत्येकी एक टँकर, चिखली तालुक्यातील कोलारा,श्रीकृष्णनगर व भालगाव येथे प्रत्येकी एक टँकर, सिंदखेड राजा तालुक्यातील सारगाव माळ येथे एक टँकर. तसेच देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथे तीन टँकर तर निमखेड येथे एक टँकरव्दारे दररोज पुरवठा करण्यात येत आहे, अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

## गडचिरोली जिल्ह्यात खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्यास मंजुरी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख आणि औद्योगिक गौण खनिजांच्या व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याच्या दृष्टीने गडचिरोलीमध्ये अल्ट्रा मेगा प्रकल्प तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (चडचए) प्रकल्प स्थापन करण्यासाठी पूरक औद्योगिक पर्यावरण निर्माण करण्याची गरज आहे. याच उद्देशाने जिल्ह्यातील खनिज क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास आणि संनियंत्रण करण्यासाठी या प्राधिकरणाची स्थापना करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्याला आज मान्यता देण्यात आली.

हे प्राधिकरण जिल्ह्यातील प्रमुख तसेच औद्योगिक महत्त्वाच्या गौण खनिजांचे योग्य व्यवस्थापन आणि नियमन करणार आहे. तसेच, या प्राधिकरणाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या या प्राधिकरणात खनिकर्म मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. याशिवाय, शासनाने नामनिर्देशित मंत्री, मुख्य सचिव आणि एकूण १३ सदस्यांचा यामध्ये समावेश आहे. कार्यकारी समितीमध्ये अध्यक्षांसह एकूण ११ सदस्य असतील, आणि ती प्राधिकरणाच्या निर्णयांची अंमलबजावणी करणार आहे.

प्राधिकरण खाण व खनिज (विकास आणि नियमन) अधिनियम, १९५७ आणि सुधारित कायदा, २०१५ तसेच प्रमुख आणि गौण खनिज नियम, २०१३ च्या अधीन राहून कार्य करेल, याबरोबरच जिल्ह्यातील खनिज संपत्तीच्या सुव्यवस्थित विकासासाठी आवश्यक धोरणांची निर्मीती, नवीन खनिज प्रकल्पांना मंजुरी आणि खाणपट्ट्यांच्या लिलावास मान्यतेसह मंजूर खाणपट्ट्यांच्या कार्यान्वयनावर प्राधिकरणाची देखरेख असणार आहे. या प्राधिकरणामुळे गडचिरोली जिल्ह्यातील खनिज क्षेत्राचा विकास जलद गतीने होईल आणि औद्योगिक प्रकल्पांना चालना मिळेल.

गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख खनिज व विशिष्ट औद्योगिक गौण खनिजाच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करणार, यासाठीच्या प्रारूप अधिनियमास मान्यता

## मासेमारी नौकांसाठी मार्च महिन्यात १ लाख ६८ हजार कि.ली. डिझेल कोटा मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सन २०२५ - २६ कालावधीकरीता राज्यातील सागरी जिल्ह्यातील १३८ मच्छिमार सहकार संस्थेतील सभासदांच्या एकूण ७ हजार ७९६ यांत्रिकी मासेमारी नौकांना मार्च महिन्यासाठी १ लाख ६८ हजार १०९ कि.ली. इतका डिझेल कोटा मंजूर करण्यात आल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने दिली आहे. मच्छिमार नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्याविषयी स्थापन केलेल्या समितीने हा डिझेल कोटा मंजूर केला आहे. यामध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या रिअर क्राफ्ट ऑनलाईन प्रणालीनुसार नौका नोंदणी प्रमाणपत्र घेतलेल्या तसेच विधीग्राह्य मासेमारी परवाना असलेल्या अधिकृत मासेमारी नौकांनाच डिझेल कोटा अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र सागरी नियमन अधिनियम १९८१ (सुधारित २०२१) च्या तरतुदींचा भंग करणाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. तसेच गस्ती नौका व ड्रोन सर्वेक्षणामध्ये दोषी आढळलेल्या नौकांचा मासेमारी परवाना रद्द केला असून अशा नौकांना डिझेल कोटा देण्याचे प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचेही मत्स्यव्यवसाय विभागाने कळविले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाबळेश्वर पर्यटन महोत्सव बोधचिन्हाचे अनावरण

## महाबळेश्वर येथे २ ते ४ मे दरम्यान पर्यटन महोत्सवाचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी २ ते ४ मे २०२५ या कालावधीत तीन दिवस महाबळेश्र्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे महाबळेश्र्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसीचे मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे २ मे २०२५ रोजी उद्घाटन होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. पर्यटन विभाग व स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय महोत्सवात प्रेक्षणीय स्थळे, स्थानिक कला - संस्कृती, खाद्यसंस्कृतीची ओळख पर्यटकांना व्हावी आणि या माध्यमातून पर्यटन वृद्धी व्हावी हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

या महोत्सवात स्थानिक लोक संस्कृतीचा समावेश असलेले कार्यक्रम तसेच नामांकित कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्ट्रॉबेरी व कृषी पर्यटन महोत्सवाचे आयोजन, महाबळेश्र्वर परिसरातील उदा. पाचगणी, कास पठार, कोयनानगर, तापोळा, गड-किल्ले दर्शन व इतर पर्यटन स्थळ, दर्शन सहलीचे आयोजन, पर्यटकांसाठी विविध श्रेणीच्या तंबू निवास उभारणी करण्यात येणार आहे. पॅराग्लाडींग, पॅरामोटरींग, जलक्रिडा, ट्रेकींग, रॉक क्लायबींग, घोडेस्वारी आदी विविध साहसी उपक्रम राबविणे, स्थानिक बचत गटांचे हस्त कला-कृतीचे प्रदर्शन व विक्रीचे दालन उभारणी, स्थानिक पाककलाकृती संस्कृती व खाद्य महोत्सव दालन उभारणी, महाबळेश्र्वर येथील विविध प्रेक्षणीय स्थळे व पुरातन मंदिरांचे दर्शन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले आहेत. या महोत्सवात विशेषतः देशांतर्गत विविध राज्यातील पर्यटन क्षेत्राशी निगडीत भागधारक, प्रवासी संस्थांचे प्रतिनिधी, ट्रॅव्हल एजेंट, टूर ऑपरेटर्स, सोशल मीडिया प्रभावक यांना आमंत्रित करुन त्यांचा समावेश असलेल्या परिचय सहलीचे आयोजन करण्यात येईल.

महाबळेश्र्वर हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील पश्र्चिम घाटात वसलेले हे एक गिरीस्थान आहे. हे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर समुद्रसपाटीपासून सुमारे ४,५०० फूट उंचीवर वसलेले आहे. जुन्या बॉम्बे प्रेसीडेन्सीची ही पूर्वीची ऊन्हाळी राजधानीचे ठिकाण होते. येथील विलक्षण हिरवळ सुंदर बागा आणि श्र्वास रोखून धरणारे दृश्य हे पर्यटकांना भुरळ घालतात. ब्रिटीश काळात बांधलेल्या असंख्य भव्य वास्तू आजही गत स्मृतींची आठवण करुन देतात. या ठिकाणी स्ट्रॉबेरी व्यतिरिक्त असंख्य नद्या, भव्य कॅस्केड, भव्य शिखरे, प्राचीन मंदिरे, बोर्डींग स्कूल, सुंदर आणि हिरवेगार घनदाट जंगल, धबधबे, टेकड्या व दऱ्यांसाठी देखील प्रसिद्धी आहे

पर्यटकांसाठी पर्यटन महोत्सव कालावधीत विविध श्रेणींतील निवास व्यवस्था उपलब्ध असून येथे ५० निवासी टेंट पर्यटक आणि मान्यवरांसाठी उपलब्ध होणार आहेत. ट्रेकिंग, रॉक क्लाइंबिंग आणि घोडेस्वारी यासारख्या साहसी उपक्रमांचा अनुभवही पर्यटकांना घेता येईल. तसेच, स्थानिक बाजारापेठांमध्ये फेरफटका, सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद आणि स्थानिक खाद्यसंस्कृतीचा आस्वादही पर्यटकांना घेता येईल. रोजच्या दिनक्रमातून दूर जात अनुभवसमृद्ध पर्यटनासाठी हा महोत्सव उत्तम पर्याय आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### धसांची नार्को टेस्ट करा - नवनाथ वाघमारे




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** सुरेश धस समाजाकडून संपले आहेत, जसे जरांगे संपले तसे आता धस देखील संपले आहेत. समाजाशी जरांगे आणि धस यांना काही देणं घेणं नाही. धस समाजाशी गोड बोलतात आणि रात्री धनंजय मुंडेंशी सेटिंग करतात, असा आरोप ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केला आहे. धसांनी हरणांचे मास खाल्ले, म्हणून त्यांना बिश्र्नोई गँगची भीती वाटत आहे. वास्तविक पाहता धस यांनी त्यांची नार्को टेस्ट करायला पाहिजे. त्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, असे वक्तव्य वाघमारे यांनी केले आहे. धसांची नार्को टेस्ट करा. अशी मागणी वाघमारे यांनी केली.

### औरंगजेबाच्या कबरीजवळील सजावट काढण्यात यावी; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** औरंगजेबच्या कबरीजवळ सजावट असेल, ती त्वरीत काढली जावी. अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात नमूद केले आहे की औरंगजेबच्या कबरीचा कुठलाही सरकारी खर्च करू नये, मराठ्यांना संपावयाला आलेला औरंगजेब इथे गाडला गेला, असे सूचना फलक लावण्यात यावे. हा सूचना फलक दाखवण्यासाठी सर्व शाळातील मुलांच्या शैक्षणिक सहली तिथे काढण्याचा आदेश काढण्यात यावा. कबर वर कोणी फुले चादर चढवायला आल्यास, देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. त्यामुळे ह्या ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत. अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सुमित खांबेक यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

### देवगडचा हापूस आंबा नांदेडमध्ये दाखल




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्यातील देवगड येथील प्रसिद्ध हापूस आंबा नांदेडमध्ये दाखल झाला. हापूस आंब्याचे स्टॉल विविध ठिकाणी उभारण्यात आले आहेत. हे आंबा खाण्यास अत्यंत चविष्ट असून, या आंब्याला साधारणता ९०० ते ९५० रुपये डझन असा भाव बाजारामध्ये सध्या मिळत आहे. हा हापूस आंबा खरेदी करण्यासाठी नागरिक देखील मोठ्या प्रमाणावर येत आहेत. कर्नाटकच्या आंब्याच्या तुलनेत हा आंबा अत्यंत गोड आहे. कर्नाटकी आंब्याला म्हणावे तेवढी मागणी नाही, व भाव देखील कमी आहेत, तरी नांदेडकरांनी या देवगडच्या हापूस आंब्याला पसंती दिल्याचे पाहायला मिळत आहे. दुकानदाराने नांदेडकरांना असे देखील आव्हान केले आहे की, एक वेळेस अवश्य आमच्या स्टॉलला भेट द्या.

### जेसीबीच्या धडकेत कचरावेचक महिलेचा मृत्यू, डंपिंग ग्राउंडवरील घटनेवरुन ठाकरे गट आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील सी.पी तलाव, वागळे इस्टेट येथील डम्पिंग ग्राउंड मध्ये कचरा वेचत असताना महिलेस जेसीबीचा धक्का लागल्याने गंभीर दुखापत झाली होती. घटनेत राजश्री बाळू जाधव यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. मृत पावलेल्या महिलेला न्याय मिळवून देण्याकरिता नातेवाईकांनी महिलेचा मृतदेह घेत रुग्णवाहिकेतून महापालिका मुख्यालयाबाहेर आणला होता. मृत पावलेल्या महिलेच्या मुलास ठाणे महानगरपालिकेमध्ये कामावर रुजू करावे व आर्थिक मदत देखील कुटुंबीयांना द्यावी अशी मागणी नातेवाईकांकडून करण्यात आली होती. घनकचरा विभागाचे अधिकारी मनीष जोशी यांनी या मागण्या त्वरित मान्य केल्या आहेत. तसेच १५ दिवसात डंपिंग हटवणार असल्याचे पालिका अधिकारी मनीष जोशी यांनी सांगितले आहे. योग्य न्याय आणि डंपिंग हटवले गेले नाही तर पालिका मुख्यालयासमोर कचरा टाकून पेटवणार असल्याचा इशारा ठाकरे गट पदाधिकारी रामेश्र्वर बचाटे यांनी दिला आहे.



# तृतीयपंथीयांच्या हक्कांचेही होणार संरक्षण - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी कल्याण मंडळाची पुनर्रचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्य शासन राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना ही करण्यात आली आहे. तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावी होण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे, याबाबतचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**

या संबंधीच्या निर्णयाची प्रत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तृतीयपंथी समुदायाच्या प्रतिनिधींना सह्याद्री अतिथीगृह येथे देण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यासंदर्भातील विविध योजना राबवण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे तृतीयपंथीय समुदायाला अधिक सक्षम आणि न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल, तसेच त्यांचे हक्क आणि कल्याण अधिक प्रभावीपणे सुनिश्र्चित करता येईल.

सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, सन २०१८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाच्या संरचनेत बदल करून सुधारित स्वरूपात नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १३ अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी नव्या सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी तृतीयपंथीयांसाठीचे धोरण - २०२४, ११ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आले होते. या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करणे आवश्यक होते.



नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण आणि कल्याण मंडळाचे अध्यक्ष असतील. तसेच समाज कल्याण आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहेत. तृतीयपंथीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अशा अशासकीय सदस्यांचाही मंडळात समावेश करण्यात आला आहे.

## ‘अभिजात मराठी’साठी लवकरच समिती गठित करणार- मराठी भाषा मंत्री उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून आता भाषेच्या संशोधन आणि विकासासाठी तसेच भाषेच्या उन्नतीसाठी काम करण्यात येत आहे. यासाठी लवकरच एक समिती गठित करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रत्येक विभागास १०० दिवसांमध्ये करावयाच्या कामांची उद्दिष्टे दिली, त्या अनुषंगाने मराठी भाषा मंत्री सामंत यांच्या अध्यकतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. बैठकीस मराठी भाषा विभागाचे सहसचिव दादासाहेब भोसले तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मराठी भाषा मंत्री सामंत म्हणाले की, मराठी पुस्तकांना पुरस्कार देण्यात येतो. वाचक हा पुस्तक खरेदी करताना प्रथम पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहून पुस्तक घेतो. त्यामुळे मराठी पुस्तकांच्या उत्तम मुखपृष्ठासाठी पुरस्कार देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

श्री.सामंत म्हणाले की, मराठी भाषा विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा भवन उभारण्याचे काम सुरू आहे. सीमा भागात असलेल्या गावामध्ये मराठी भाषेच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री श्री.सामंत यांनी यावेळी सांगितले.

## अती दुर्गम भागातील 'कनेक्टिव्हिटी' वाढविण्यासाठी केंद्राला राज्य शासनाचे संपूर्ण सहकार्य - मुख्यमंत्री



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतीदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यास राज्यशासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल. टॉवर उभारण्यासाठी गडचिरोलीच्या अतीदुर्गम भागात संपूर्ण सुरक्षा दिली जाईल. या भागात संपर्क यंत्रणा उत्तम प्रकारे निर्माण झाल्यास येथील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे सोयीचे होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीदरम्यान सांगितले.



गडचिरोलीसह अन्य ठिकाणी दुर्गम भागातही संपर्क यंत्रणा निर्माण करण्यात येत आहे. भारत नेट टप्पा दोन अंतर्गत संपूर्ण ग्रामपंचायतीमध्ये राज्यात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी शासन काम करेल. या टप्प्यातही राज्य देशात सर्वात पुढे राहून काम करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

बीएसएनएल व एमटीएनएलच्या मुंबईतील मालमत्तांवर असलेली आरक्षणे आणि उद्देश तपासून घेण्यात येतील. यापैकी नियमानुसार काढणे शक्य असलेली आरक्षणे काढण्याची कार्यवाही करण्यात येईल. या मालमत्तांवर नागरिकांसाठी विविध सोयी सुविधा निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे. याबाबत गठित केलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर राज्य शासन कार्यवाही करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

गडचिरोलीच्या अती दुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण झाल्यास नक्षलवादाचा संपूर्णपणे बीमोड करणे राज्य शासनाला शक्य होणार आहे. शासनाने नक्षलवाद संपवण्यासाठी सुरू केलेल्या कार्यवाहीत संपर्क यंत्रणा निर्माण झाल्यास अधिक बळ मिळेल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत बीएसएनएल आणि एमटीएनएलच्या मुंबईतील मालमत्ता, मोबाईल टॉवर उभारणी, प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत भारत नेटच्या अंतर्गत निर्माण होणारी संपर्क यंत्रणा आदींबाबत सविस्तर चर्चा झाली.

# महाराष्ट्र दत्तक प्रक्रियेत देशात अव्वल स्थानी

## ५३७ बालकांना मिळाले हक्काचे ‘घर’

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याने दत्तक प्रक्रियेत देशात अव्वल स्थान पटकावले आहे. सन २०२४-२५ या वर्षात सर्वाधिक ५३७ बालकांना कायदेशीर प्रक्रियेनंतर दत्तक इच्छुक पालकांना सोपविण्यात आले. यामुळे बालकांना हक्काचे ‘पालक’ व ‘घर’ मिळाले आहे, अशी समाधानाची भावना महिला व बाल विकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्त केली.



देशात एकूण कायदेशीर दत्तक मुक्त बालकांची संख्या ४५१२ इतकी असून यापैकी महाराष्ट्रात एकूण ५३७ बालके कायदेशीर दत्तक मुक्त करण्यात आली आहे. या दत्तक प्रक्रियेद्वारे हक्काचे आई-वडील व कुटुंब मिळवून देण्यात आली आहेत. सातत्याने काम करुन दत्तक प्रक्रियेमध्ये महाराष्ट्राला देशात अव्वलस्थानी आणल्याबद्दल या उल्लेखनीय यशासाठी महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, संस्था व राज्याच्या दत्तक स्त्रोत संस्थांचे अभिनंदन केले आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, सुधारीत अधिनियम २०२१ आणि कारा दत्तक नियमावली २०२२ च्या अनुषंगाने राज्यात प्रभावीपणे दत्तक प्रक्रिया राबवण्यात आली आहे. केंद्रीय दत्तक स्त्रोत संस्था (कारा), नवी दिल्ली यांनी या उल्लेखनीय कामाची दखल घेतली आहे. महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत ६० विशेष दत्तक मान्यता प्राप्त संस्था कार्यरत असून, या संस्थांच्या माध्यमातून दत्तक पात्र बालकांना कायदेशीर मुक्त घोषित करून त्यांना हक्काचे पालक व कुटुंब मिळवून देण्याचे कार्य केले जाते.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव आणि आयुक्त नयना गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवली जात आहे. अनेक बालकांना सुरक्षित आणि प्रेमळ कुटुंब मिळावे यासाठी दत्तक प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

# लाडक्या बहीण योजनेचा हप्ता देण्यासाठी सरकार कटीबद्ध

## पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजना जर बंद व्हायची असती तर ती मागच्या काळातील बंद झाली असती. निवडणूक झाल्यावर सुद्धा लाडकी बहीण योजना ही सुरू आहे. लाडकी बहीण योजनेचा हफ्ता देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. राज ठाकरे यांचे कामच आहे जे बोलायचे आहे ते बोलायचे, मात्र जे काही बोलले ते शेवटपर्यंत बोलले पाहिजे असं मला वाटत. असे मत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.




यावेळी ते म्हणाले की, राज ठाकरेंचे शेतकरी कर्जमाफी आश्र्वासन फक्त दिले, वक्तव्य कर्जमाफीची घोषणा केलेली आहे. मात्र, आजच्या असते कर्जमाफी होईल, असे कोणतही सरकार नाही. अजित पवारांनी सांगितले आहे की, कर्जमाफी ही या वर्षी होऊ शकत नाही. आणि ते सत्य बोलणे काही चुकीचे नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत कर्जमाफी केली नाही तरी देखील त्यांच्या अंगीकृत योजना व सवलती सरकार करत आहे.

ऑन राज ठाकरेंचा आस्थापनेत असलेला हिंदी मुद्दा योग्य आहे. महाराष्ट्रात जो राहतो त्यांनी मराठी बोललीच पाहिजे, हा राज ठाकरे यांचा मुद्दा आम्हाला पटला आहे. महाराष्ट्रात जो राहील तो मराठी आणि हिंदुस्थानात जो राहील तो हिंदुस्तानी. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी बोलल पाहिजे हे आमच सुद्धा मत आहे. राज ठाकरे औरंगजेब कबर मुद्दा उपस्थित केला आहे. औरंगजेब कबरीबाबत प्रत्येकाचा वेगवेगळा विचार आहे. वेगवेगळ्या विचारांच्या माध्यमातून हा विचार आलेला आहे. मागच्या काळात राज ठाकरे यांनी सांगितले होते की, या ठिकाणी माझा झेंडा वेगळा राहील दोन वेळेस अशा पद्धतीचे चित्र हे राज ठाकरे यांचा राहिला आहे. राज ठाकरे यांच्या भूमिका या नेहमी वेगवेगळ्या पद्धतीने बदलत असतात.

राज ठाकरे यांना जे वाटलं ते ते बोलले. इतर पक्षांना जे वाटलं ते इतर पक्षांनी स्पष्ट केले. संजय राऊत नरेंद्र मोदी यांचा वारसदार महाराष्ट्रातील असेल, वक्तव्य वारसदार कोण आहे हे मला माहिती नाही. असे स्पष्टीकरण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी दिले.

# वर्षभरात कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून येईल - आमदार सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर /प्रतिनिधी : मेहकर –लोणार मतदार संघात तब्बल ८७ टक्के जनता ही ग्रामीण भागाशी निगडित आहे आणि विशेष करून ९९ टक्के जनतेचा शेती हा व्यवसाय शेतीशी निगडित त्यांचे काम आहे.मात्र, मतदारसंघात शेतकऱ्यांच्या दृष्टीने पायाभूत सुविधा नाहीत. शेतीला चालना देण्यासाठी कोणतेही उद्योग व्यवसाय नाहीत. त्यामुळे शेतकरी वर्ग हा वर्षानुवर्षांपासून केवळ काबाडकष्ट करून जगत आहे. मात्र त्यांचा आर्थिक विकास झाला नाही. येणाऱ्या वर्षात मेहकर– लोणार मतदारसंघात कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल होईल. शेतीचा रोड मॅप तयार करण्यासाठी कृषी विभागाचे बैठक घेण्यात आली आहे. त्यावर मॅरेथॉन चिंतन ही झाले आहे.येणाऱ्या वर्षभरात आता याचा आमुलाग्र बदल दिसेल.अशी ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली.**



यावेळी माहिती देताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, मेहकर –लोणार मतदार संघातील शेतीशी संबंधीत अमुलाग्र बदल करण्यासाठी कृषी विभाग व कृषी विभागाशी संलग्नित विभागाची बैठक घेण्यात आली आहे. महाराष्ट्रात शहरीकरण ५० टक्क्यांवर गेले आहे. मात्र, मेहकर मतदारसंघात केवळ १३ टक्के शहरीकरण आहे. उर्वरित भाग पूर्ण ग्रामीण आहे. ९९ टक्के लोक हे कृषी क्षेत्राशी निगडित आहेत.मात्र, कृषी क्षेत्राला अपेक्षित अशी उभारी मिळालेली नाही.

कृषी क्षेत्राला उभारी देण्यासाठी मतदारसंघातील बागायतदार शेतकरी यांच्यासाठी फॉरवर्ड लिंकेज तयार करण्यासाठी व त्यांचे जीवनात अमुलाग्र बदल करण्यासाठी १ एप्रिल रोजी बैठक घेण्यात आली आहे. कृषी विभागाची ही बैठक केवळ आढावा बैठक म्हणून घेतली नाही तर, या बैठकीत रोड मॅप काय असेल यावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मतदारसंघात क्लोड स्टोरेज अर्थात वेअर हाऊस नाहीत. येणाऱ्या वर्षभरात मेहकर – लोणार तालुक्यामध्ये दहा कोल्ड स्टोरेज तयार करण्यात येणार आहेत. या परिसरात संत्रा, चिकू, पपई, पेरू या संदर्भात पल्प युनिट तयार करण्यासाठी सूचना केल्या आहेत. याचा वापर करण्याच्या सुचना कृषी विभागाला केल्या आहेत.यामध्ये मेहकर –लोणार मतदार संघात स्वतंत्र कन्सल्टंट येथे नियुक्त करून विविध योजना, शेतकरी दौरे, पीक पॅटर्न बदल, मार्केटला पिकाच्या भावाची हमी आदी विषयांवर मॅरेथॉन चर्चा झाली आहे. त्या संदर्भात कृषी विभागाला सूचना केल्या आहेत.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे अधिकारी इतर अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत विविध विषयावर अमुलाग्र बदल करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने बदल येण्याच्या सुचना कृषी विभागाला देण्यात आल्या आहेत.अशी माहिती आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव,युवा सेनेचे आकाश घोडे, निंबाभाऊ पांडव,दत्ता घनवट, साहेबराव हिवाळे, विजय मोरे ड संदीप गवई,ऋषी जगताप, स्वप्नील हाडे,उपतालुकाप्रमुख रमेश देशमुख,जीवन घायाळ, विजय लहाने, संतोष लोखंडे, सह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर; एप्रिल ते जून दरम्यानचा दौरा कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** माहे एप्रिल ते जून २०२५ दरम्यान राबविण्यात येणारा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. शिबिराच्या ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक व सहायक रोखपाल हजर राहणार आहेत. नागरिकांनी तालुका स्तरीय शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे.

शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : एप्रिल महिण्यात जळगांव जामोद येथे ४, शेगांव ७ व २४, मेहकर ९ व २९, खामगांव ११ व २५, मलकापूर १५ व २८, चिखली १६, देऊळगांव राजा १७, लोणार २२, नांदुरा २१, सिंदखेडराजा २३ रोजी होणार आहे. माहे मे महिण्यात जळगांव जामोद ५, शेगांव ६ व २६, मेहकर ८ व ३०, खामगांव १३ व २७, मलकापूर १४ व २९, चिखली १६, देऊळगाव राजा १९, लोणार २०, नांदुरा २२, सिंदखेड राजा २३ रोजी होणार आहे. तसेच माहे जून महिण्यात जळगांव जामोद येथे ५, शेगांव ६ व २४, मेहकर ९ व ३०, खामगांव १० व २६, मलकापूर १२ व २७, चिखली १६, देऊळगाव राजा १७, लोणार १९, नांदुरा २०, सिंदखेड राजा २३ रोजी होणार आहे.

### रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याचे आवाहन




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** जिल्हा रुग्णालय येथील रक्त साठा अल्प प्रमाणात शिल्लक असून रक्त पुरवठा संकलन करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक संघटनांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा रुग्णालय रक्त केंद्र जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी यांनी केले आहे.

रक्त केंद्रातून प्रती महिना सरासरी ३०० रक्त पिशव्या ह्या निशुल्क रक्त संक्रमणासाठी उपलब्ध केल्या जात आहे. उन्हाळ्यामध्ये रक्त दान शिबिरांचे आयोजन होत नसल्यामुळे रक्त संकलन ठप्प झाले आहे. तसेच या कालावधीत रक्ताची मागणी जास्त असल्याने रक्त केंद्रात अल्प प्रमाणात रक्त पिशव्या शिल्लक आहे. थॅलेसीमिया व सिकल सेल रुग्ण यांना कायमस्वरुपी आणि अपघात झालेल्या व्यक्ती, गर्भवती स्त्रिया व इतराना आपत्कालीन परिस्थितीत रक्ताची गरज असते. त्यामुळे जास्तीत जास्त रक्त संकलन होण्यासाठी स्वयंसेवी संस्थानी रक्तदान शिबीरांचे आयोजन करुन रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बोरगाव मंजू परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस; पावसामुळे आंबा व पपई पिकाचे मोठे नुकसान





दैनिक आपला विदर्भ

**अकोला /प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातल्या बोरगाव मंजू, निपाणासह जिल्ह्यातील काही भागात अवकाळी पावसामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर काल रात्री अकोल्यातल्या बोरगाव मंजू परिसरात पावसासह जोरदार वारा सुटला होता. त्यामुळे परिसरातील शेतशिवारात फळबागांना फटका बसला आहे. तर रवी जायले यांच्या शेतातल्या आंबा पिकाचे नुकसान झाले. प्रत्येकी झाडातून सरासरी १५ ते २० किलो आंबे वाऱ्यामुळे खाली पडले आहेत. तर याशिवाय वाऱ्यामूळ ज्वारी पिकाचे नुकसान झाले आहे. तर काही शेतकऱ्यांच्या पपई पिकांचे देखील नुकसान झाले आहे.

### नागपुरातील देवनगर सोसायटीची जागा रहिवास क्षेत्रात समाविष्ट



**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेतील मौजे अजनी येथील देवनगर को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या काही भागातील जागेस क्रीडांगणांच्या आरक्षणातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याच्या प्रस्तावास आज झालेल्या मंत्री मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

याबाबत देवनगर को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीने संस्थेच्या काही भागातील रहिवास क्षेत्र क्रीडांगणासाठी म्हणून आरक्षणात समाविष्ट केले गेले होते. याठिकाणी अनेक घरे असल्याने या जागेचा रहिवासी क्षेत्रात समावेश करण्यात यावा, अशी नागरिकांची, लोकप्रतिनिधींची मागणी होती. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास आज मंत्रिमंडळाने मंजूरी दिल्याने, हा क्षेत्र आता रहिवास क्षेत्रात समाविष्ट होणार आहे.

## महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला : माजी आ. चटप

दैनिक आपला विदर्भ




**चंद्रपूर /प्रतिनिधी :** सन २०२४ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुती यांनी आम्ही सत्तेत आलो तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करू असे जाहीर आश्वासन जाहीरनाम्याद्वारे दिले होते. तसेच वेगवेगळ्या जाहीर सभामधूनही प्रमुख नेत्यांनी जाहीर केले होते. परंतु, आता अजित पवार यांनी जाहीरपणे वक्तव्य केले की, आजच्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता कर्जमाफी देणे शक्य नाही व बँकांना आदेश दिले की, तात्काळ कर्जाची वसुली करावी तसेच शेतकऱ्यांना सांगितले की, दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत कर्जाच्या रक्कमेची परतफेड करावी यावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अर्थमंत्र्यांचे विधान हीच सरकारची भूमिका आहे, हे मान्य केले.

राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जाहीरपणे सांगितले की, कर्जमुक्तीचे आश्वासन आमच्या जाहीरनाम्यात दिले गेले होते. अशा तऱ्हेने राज्य सरकारच्या वतीने अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात कर्जमाफीची घोषणा न करून शेतकऱ्यांचा विश्र्वासघात केला आहे. असे आयोजित पत्रकार परिषदेत शेतकरी नेते माजी आमदार वामनराव चटप यांनी सांगितले. सरकारने शेतकऱ्यांच्या विश्र्वासघात केल्यामुळे शेतकरी संघटनेची कार्यकारणी बोलवण्यासाठी अध्यक्षांना विनंती करणार आहे. अध्यक्षांनी आंदोलनाची भूमिका कार्यकारणीत घेणार असल्याचे प्रतिक्रिया यावेळी माजी आमदार शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार वामनराव चटप यांनी दिली.

## मिशन लक्ष्यवेध अतंर्गत खाजगी अकादमी सक्षमीकरणासाठी आर्थिक सहाय्य

■ प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा /प्रतिनिधी :** राज्य शासनाने मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवड करण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारात दर्जेदार खेळाडू निर्माण करणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशया संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील खाजगी अकादमींनी/संस्थांनी प्रस्ताव सादर करावा. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानगर यांनी केले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरीता राज्यातील खेळाडूंसाठी अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभुत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरीता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी/विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्यादृष्टीने संबधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा, साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'क'वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'ब'वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'अ'वर्ग अशया प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. 'क'वर्ग अकादमींना वार्षिक रु.१० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रु.२० लक्ष व 'अ'वर्ग अकादमींना वार्षिक रु.३० लक्ष आर्थिक सहाय्य, पायाभुत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी अर्जाच्या विहीत नमून्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधावा व सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# शेगावात जड वाहनांना बंदी घालावी

## शहर पो स्टे व पालिका प्रशासनाकडे विविध सामाजिक संघटनांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**शेगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव शहरातील वर्दळीच्या मार्गावर जड वाहनांना बंदी घालून जड वाहतूक गावाबाहेरून वळवावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने शहर पोलीस स्टेशन, नगर पालिका प्रशासनाकडे करण्यात आली आहे. चार दिवसापूर्वी याच ठिकाणी अपघात होऊन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष हे जागीच ठार झाले होते.

संत गजानन महाराज समाधी मंदिर असल्याने शेगाव शहरात दर्शनासाठी असंख्य अशा प्रवासी वाहने येतात. शहरात वाहनांच्या वर्दळीचे प्रमाण वाढले आहे. अशातच शेगांव शहरातील माणिक स्टेअर्स, शिवनेरी चौक, मुरारका शाळेजवळील चौक, काशेलानी पेट्रोल पंप या रस्त्यावर कन्या शाळा, महात्मा ज्योतीबा फुले शाळा, अहील्यादेवी होळकर न प शाळा, मौलाना अब्दुल आझाद शाळा, टिपू सुलतान शाळा, राष्ट्रमाता इंदीरा गांधी शाळा, ग भि मुरारका शाळा, ग.भी. मुरारका महाविद्यालय आहे. दररोज प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांपासुन ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत हजारो विद्यार्थी या रस्त्याने ये जा करत असतात. आधीच या रस्त्यावर भाविक भक्तांच्या चारचाकी वाहनांची वर्दळ असते. त्यातच आता जड वाहने सुध्दा या रस्त्याने येत जात असुन जड वाहने ही भरधाव वेगाने जाताना दिसुन येतात यामुळे या रस्त्याने ये जा करणा–या विद्यार्थ्याच्या जिवाला धोका निर्माण आला आहे. नुकतीच मुरारका शाळेजवळ एका भरधाव जड वाहनाने झालेल्या अपघातात इसमाचा जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. अशा प्रकारची घटना पुन्हा भविष्यात होवुन नये त्यासाठी माणिक स्टोअर्स येथुन ते काशेलानी पेट्रोल पंप पर्यंत जड वाहनांना प्रवेश बंदी घालण्यात यावी ,अन्यथा भविष्यात अशाप्रकारची कोणतीही घटना घडल्यास सदर घटनेस आपले पोलिस व नगर परिषद प्रशासन जबाबदार राहील. यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने आदोलन करण्यात येईल. असा ईशाराही विहिरीचे चंद्रकांत घोराळे,युवा क्रांती संघटनेचे अध्यक्ष विजय यादव,श्रीशिवप्रतिष्ठानचे प्रविण मोरखडे,भाजपाचे रोहीत धाराशिवकर, मुकुंदा खेडकर आदींची एवढी उपस्थिती होती.